# प्रेस नोट ता.२५/११/२०२२

## चिखली येथील भोसले पेट्रोल पंपावर झालेल्या चोरीच्या गुन्हयाची ४८ तासात उकल
## पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

दि.२०/११/२०२२ रोजी चिखली परीसरातील भोसले बद्रर्स पेट्रोलियम या पेट्रोल पंपाची दिवस भरामध्ये जमा झालेली रोख रक्कम ८,९३,१३६/- रू ही पेट्रोल पंप बंद झाले नंबर पेट्रोल पंपाचे ऑफीसमधिल लाकडी लॉकरमध्ये ठेवली असताना रात्रौ २२.३० वा. ते सकाळी ०६.०० वा. चे दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने लाकडी ड्राव्हरचे बनावट चावीने लॉक उघडुन रोख रक्कम चोरी करून नेली होती. म्हणुन पेट्रोल पंपाचे मालक विशाल जगन्नाथ भोसले, रा.संभाजीनगर, चिंचवड, पुणे यांनी चिखली पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्यानेसदर बाबत गु.रजि.नं. ६३४/२०२२ भादवि कलम ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मा.वरिष्ठांचे मागदर्शनाखाली सदर गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना गुन्ह्यातील फिर्यादी यांचेकडे गुन्ह्याचे ठिकाणी पेट्रोल पंपावर यापुर्वी काम करणारे इसम व त्यांना ज्यांच्यावर संशय आहे अशा इसमाबाबत चौकशी केली असता त्यांनी काम सोडुन गेलेल्या व त्यांना संशय असलेल्या इसमा बाबत माहिती दिली. त्यानुसार फिर्यादी यांचेकडुन सदर इसमांचे नाव पत्ते व मोबाईल नंबर प्राप्त करून त्यांचे सी.डी.आर. काढुन त्यांचे विश्लेषण करता पुर्वी काम सोडुन गेलेला इसम नामे **अंकित रामबहादुर यादव, वय २२ वर्षे, रा.मु.मोहरीया, पो.इटवा. ता.महु, जि.चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश** याचे वर्णन सी.सी.टिव्ही फुटेजमध्ये दिसत असलेल्या इसमाशी मिळते जुळते असल्याचे दिसुन आले. तसेच तांत्रिक विश्लेषणामध्ये त्याचा घटनेच्या दिवशी वावर हा पिंपरी चिंचवड शहरामध्ये असल्याचे दिसुन आल्याने त्याचे बाबत अधिक संशय बळवला. त्यानंतर त्याचे ठाव ठिकाणा बाबत अधिक माहिती घेता तो पुणे शहरातुन त्याचे गुळगावी **मु.मोहरीया, पो.इटवा. ता.महु, जि.चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश** या ठिकाणी जात असले बाबतची माहिती प्राप्त झाली.

त्यानुसार मा.वरिष्ठांचे परवानगीने गुन्हे शाखा, युनिट १ कडील पोलीस उप निरीक्षक रविंद्र राठोड, पोलीस अंमलदार महादेव जावळे, फारूख मुल्ला, गणेश महाडीक, अमित खानविलकर, सचिन मोरे यांचे पथकाने **मु.मोहरीया, पो.इटवा. ता.महु, जि.चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश** येथे जावुन स्थानिक पोलीसांचे मदतीने शोध घेता तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन गुन्हे शाखा, युनिट १ कार्यालय येथे आणुन त्याचेकडे अधिक सखोल चौकशी करता त्याने गुन्हा केल्याचे मान्य केले. त्यानंतर सदर आरोपी यास पुढील कारवाई कामी चिखली पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

आरोपी अंकित रामबहादुर यादव, हा पुर्वी पेट्रोल पंपरवर कामास होता त्यामुळे त्यास पेट्रोल पंपावर जमा होणाऱ्या रोख रक्कमे बाबत कल्पना होती. त्याने उत्तर प्रदेश येथुन येवुन चोरी करून तो रातेरात उत्तर प्रदेश येथे गेल्याचे उघड झाले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे, सहायक पोलीस आयुक्त प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर, पोलीस उप निरीक्षक इम्रान शेख, रविंद्र राठोड, तसेच पोलीस अंमलदार महादेव जावळे, फारूख मुल्ला, गणेश महाडीक, अमित खानविलकर, सचिन मोरे यांचे पथकाने केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त
गुन्हे, पिंपरी चिंचवड